# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२४

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : **(क)** "श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(छ)** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** "शुल्क नियामक प्राधिकरण यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** "महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** "राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) सन २०२३-२०२४ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल आणि (२) सन २०२३-२०२४ या वर्षाचा वित्तीय

अस्थायी प्रत

लेखा अहवाल, खंड-एक व खंड-दोन तसेच (३) "महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांचे व्यवस्थापन" यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**तीन : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**चार : मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव –**

विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

**(१)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा, मुंबई यांचेविरुध्द दिनांक ३० मे, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**(२)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी सत्यलढा स्थानिक युट्यूब चॅनलचे संपादक श्री. सतिश देशमुख व पत्रकार श्री. गणेश सोनावणे, श्रीमती हर्षदा सोनावणे, श्री. अमोल नांदुरकर व श्री. अंकुश गावंडे (स्थानिक युवक) यांचेविरुध्द दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७८ च्या पोट नियम (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

अप्रकाशित प्रत

**पाच : शासकीय विधेयके —**

**(क)** "सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४" या विधेयकावरील दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीवर विधानपरिषदेचे खालील सदस्य नामनिर्दिष्ट करण्याबाबत :-

(१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स.
(२) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.
(३) श्री.अमित गोरखे, वि.प.स.
(४) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(५) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स
(६) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.
(७) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ — महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ — महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(ग) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४

---

अप्रकाशित प्रत

## - मध्यंतर -

**सहा : (गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ व शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, श्रीमती प्रज्ञा सातव, धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** —

"राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, गुन्ह्यांना आळा घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यात अवैध धंद्यात झालेली वाढ, परभणी जिल्ह्यात संविधानाची विटंबना केल्याने उक्त घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी बांधवांनी केलेल्या आंदोलनावर कोंबिंग ऑपरेशनच्या नावाखाली लाठीचार्ज करणे, आंदोलना दरम्यान सोमनाथ सुर्यवंशी या निरपराध युवकाचा कारागृहात झालेला मृत्यु, बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात संतोष देशमुख या सरपंचाचे अपहरण करुन केलेली हत्या, सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांचे अपहरण करुन करण्यात आलेली हत्या, सत्ताधारी पक्षाचे वांद्रे येथील माजी लोकप्रतिनिधी यांची करण्यात आलेली हत्या, अश्या अनेक घटना राज्यात घडल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली असणे, राज्यात ग्रामीण व शहरी भागात अंमली पदार्थांची तस्करी, विक्री व सेवन मोठ्याप्रमाणात होत असून यामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत असणे, आचारसंहिता काळात सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी पोलीस दलाचा गैरवापर करुन विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणे, तसेच तडीपारीच्या नोटीस काढून त्यांचेवर दबावतंत्राचा वापर करणे, बदलापूर येथे शाळकरी मुलींवर केलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेप्रमाणेच राज्यात अनेक ठिकाणी महिलांवरील अत्याचाराच्या घडलेल्या घटना, त्यामुळे जनतेमध्ये झालेला उद्रेक, शासकीय रुग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकारी व नर्ससेची कमतरता, ग्रामीण भागात एमबीबीएस डॉक्टर मिळत नसल्याने पर्यायी व्यवस्था करणे, राज्यात मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू इत्यादी रोगांच्या साथी आटोक्यात आणण्यासाठी

अप्रकाशित प्रत

शासनाने करावयाची उपाययोजना, राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये तसेच शासकीय, निमशासकीय रुग्णालयांना आवश्यक औषधे व वैद्यकीय साहित्य खरेदी व त्यांची गुणवत्ता पडताळणी यामध्ये झालेले गैरव्यवहार, विदर्भ-मराठवाडा-खान्देश व पश्चिम महाराष्ट्रातील सोयाबीन, तूर, कापूस व धान इत्यादी हमी भावापेक्षा कमी भावात खरेदी करण्यात येणे, खरेदी केंद्रे उशिरा सुरु झाल्याने शेतक-यांना आपला माल खाजगी व्यापा-यांना कमी दरात विकावा लागणे, त्यामुळे शेतकरी हवालदील झालेला असणे, भारतीय कापूस महामंडळाने देशभरात ३४ लाख कापसाच्या गाठी खरेदी करणे, सर्वाधिक तेलंगणा राज्याने २० लाख गाठीची खरेदी करणे, महाराष्ट्रात केवळ ५ लाख ४२ हजार गाठींची खरेदी करणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे शेतीच्या उत्पादनात घट झाल्याने शेतकरी त्रस्त होणे, तसेच ट्रान्सफॉर्मरची नादुरुस्ती व अपुरा पुरवठा यामुळे शेत पिकांचे होत असलेले नुकसान, माहे जून ते नोव्हेंबर, २०२४ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील फळपिकांचे नुकसान झाले असणे, कोकणातील हापूस आंबा, काजू व सुपारी उत्पादन घेण्याऱ्या बागायतदारांना पिक विमा देण्यासाठी होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील अनेक सिंचन प्रकल्प अपुर्णावस्थेत व बंद स्वरुपात असल्याने विदर्भातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे, गत १२ वर्षात विदर्भात एकही सिंचन प्रकल्प न येणे, वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदी जोड प्रकल्प, मराठवाडा वॉटरग्रीड, पोकरा टप्पा - २ या प्रकल्पाच्या नुसत्या घोषणा करणे, गत दहा वर्षांपासून एक रुपयाचीही तरतूद न करणे, तसेच जलयुक्त शिवार टप्पा -२ सारखे महत्वकांक्षी प्रकल्प सुरु करुनही भर पावसाळयात जनतेला टँकरने पाणीपुरवठा करावा लागणे, विदर्भ तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीची झळ कमी व्हावी म्हणून जलयुक्त शिवार टप्पा -२ तसेच नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प टप्पा -२ यासारखे प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित असून पुर्णत्वास नेले नसल्यामुळे जलसिंचनाच्या अनुशेषात झालेली वाढ, मातोश्री पांदण रस्ते योजना क्लिष्ट असल्यामुळे योजनेची अंमलबजावणी न होणे, मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्वकांक्षी प्रकल्पास महायुती सरकारने सन २०१९ मध्येच तत्वतः मान्यता देवूनही प्रकल्पाच्या सर्वेक्षणा इतकीही तरतूद करण्यात आलेली नसल्यामुळे प्रकल्पास होत असलेला विलंब, विदर्भ औद्योगिक दृष्ट्या मागासलेला असून औद्योगिक विकासासाठी धोरण तयार करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, राज्यातील

अग्रिम प्रत

उद्योग परराज्यात गेल्याने बेरोजगारीचे वाढलेले प्रमाण, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारकाचे काम धिम्या गतीने सुरु असून अरबी समुद्रात उभारण्यात येणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकाची केवळ घोषणा करणे, त्यासाठी निधीची ठोस तरतूद करण्यात आली नसल्याने होत असलेला विलंब, सिंधुदुर्गामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा निकृष्ट बांधकामामुळे आठ महिन्यांतच कोसळण्याची घडलेली घटना, "हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" महामार्गावर गत दोन वर्षात १४० अपघातामध्ये २३३ नागरिकांचा झालेला मृत्यू, राज्यात शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे शाळेच्या गुणवत्तेसह प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होणे, तद्नुषंगाने रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शालेय गणवेश विद्यार्थ्यांस पुरविण्यास होत असलेला विलंब, तसेच सदरहू गणवेश निकृष्ट व विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे मोजमाप योग्य नसल्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेश परिधान करण्यास येत असलेल्या अडचणी, अनेक शाळांचे खाजगीकरण करुन उद्योजकांना देण्यात येत असलेला प्रयत्न, राज्यातील बांधकाम कामगारांना शासनामार्फत देण्यात येत असलेल्या सोयी सुविधांमध्ये सुरु असलेला अनागोंदी कारभार, त्यामुळे कामगारांचे होत असलेले नुकसान, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**सात** : **(मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२४, बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४, गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ व शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री प्रविण दरेकर**, हेमंत पाटील, विक्रम काळे, परिणय फुके, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री कृपाल तुमाने, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय, निरंजन डावखरे, राजहंस सिंह, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री किशोर दराडे, पंकज भुजबळ, शिवाजीराव गर्जे, इद्रिस नाईकवाडी, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** –

"सन २०१४ ते २०१९ या कालावधीत तत्कालीन सरकारने राज्यातील जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असणारे परंतु अनेक वर्षापासून प्रलंबित

असणारे प्रकल्प जसे की, नवी मुंबई विमानतळ, शिवडी न्हावाशेवा सागरी महामार्ग, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष इत्यादी प्रकल्पांना गती मिळणे, परिणामी आज हे सर्व महत्वकांक्षी प्रकल्प दृष्टीक्षेपात येणे, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये परत महायुती सरकार सत्तेवर आल्याने, विदर्भ मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये राज्यातील जनतेसाठी विशेषतः शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा- २ तसेच जलयुक्त शिवार टप्पा-२ सारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लागतील अशी आशा निर्माण होणे, राज्यातील शेतकऱ्यांच्या विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे असणाऱ्या वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाला, तत्वतः मान्यता गत महायुती सरकारने दिलेली असल्याने, हा प्रकल्प तातडीने सुरु करून विदर्भातील सर्व शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता; त्याकरीता, या प्रकल्पाची कालबध्द रीतीने अंमलबजावणी करावी, अशी जनतेमधून होत असलेली मागणी, विदर्भ तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीची झळ कमी व्हावी, याकरीता महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत कार्यवाही न झालेल्या जलयुक्त शिवार टप्पा-२, तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ ह्या प्रकल्पांची अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याची शेतकरी बांधवांकडून होत असलेली मागणी, तसेच विदर्भ, मराठवाड्यातील अनुशेष दूर व्हावा याकरीता विविध प्रकल्पांना गती देण्याची आवश्यकता, संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांसाठी, अतिशय महत्वाचे असणारे पांदण रस्ते तातडीने पूर्ण व्हावे याकरीता "मातोश्री पांदण रस्ते" योजने मध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बदल करून, या योजनेची अंमलबजावणी सुटसुटीत व्हावी याकरीता आवश्यक ते प्रयत्न करण्याची आवश्यकता, मराठवाड्यातील जनतेसाठी महत्वाचा असणाऱ्या "मराठवाडा वॉटर ग्रीड" या महत्वाकांक्षी प्रकल्पास महायुती सरकारने २०१९ मध्येच तत्वतः मान्यता देणे, परंतु महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत या प्रकल्पावर कार्यवाही न होणे, आता परत महायुती सरकार सत्तेवर आल्याने ह्या प्रकल्पाना देखील गती मिळावी अशी मराठवाड्यातील जनतेची होत असलेली मागणी, विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील जनतेच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने समृध्दी आणणारा "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" समृध्दी महामार्ग महायुती सरकारच्या कालावधीत सुरु होणे, या

महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण होवून हा महत्वाकांक्षी महामार्ग जनतेच्या सेवेसाठी तातडीने उपलब्ध व्हावा, अशी संपूर्ण राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी महायुती सरकारने हमी भावाने, सोयाबीनची विक्रमी खरेदी करणे, परंतु शेतकऱ्यांची वाढती मागणी लक्षात घेता, सदर खरेदी जानेवारीपर्यंत सुरु राहावी अशी शेतकरी बांधवांकडून होत असलेली मागणी, राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरीता राज्यातील सर्व सबस्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याच्या योजनेला गती देण्याची आवश्यकता, शेतकरी बांधवांच्या या विविध समस्या सोडविण्याकरीता शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी मूल्यसाखळी निर्माण होऊन यांचे शेतमालास चांगला दर मिळावा याकरिता SMART व MAGNET सारखे प्रकल्प विदर्भामध्ये प्राधान्याने मान्यता देऊन सुरु करण्याची आवश्यकता, तसेच रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता उद्योग विभागाची समूह विकास योजना विदर्भामध्ये प्राधान्याने राबविण्याची आवश्यकता, महायुतीचे सरकार परत सत्तेवर आल्याने मुंबईसह MMRDA परिसरातील महत्वाचे पायाभूत सुविधांचे प्रकल्प, जसे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कोस्टल रोड, उर्वरीत मेट्रो प्रकल्प व इतर प्रकल्प तातडीने सुरु होऊन जनतेच्या सेवेत उपलब्ध होण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व त्यावर करावयाच्या शासकीय उपाययोजना."

**"राष्ट्रगीत."**

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २० डिसेंबर, २०२४.

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.